नवराष्ट्र
www.navarashtra.com

# वाचन संस्कृतीची जपणूक करून जीवन समृद्ध करा

**उमरगा,(वा.)** वाचन हे समृद्ध जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. वाचनामुळे व्यक्तीमत्व विकास होतो. वाचन संस्कृति सुखी, आनंदी जीवनाचा पाया आहे. जीवनातील निखळ आनंदाचा शोध घेण्यासाठी वाचनाची आवड निर्माण करा. वाचन संस्कृतीची जपणूक हि मानवी मनाची मोठी संपत्ती आहे.

वाचन संस्कृतीची जपणूक करून आपले जीवन समृद्ध करा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या वतीने आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधी दरम्यान घेण्यात येत आहे. या निमित्त शुक्रवारी महाविद्यालयात वाचन काल,आज आणि उद्या या विषयावर प्राचार्य डॉ.दिलीप गरुड बोलत होते.



## वाचनामुळे आकलनक्षमता वाढण्यास मदत

पुढे बोलताना प्राचार्य डॉ.गरुड म्हणाले की, विस्मरण हे मानवी मानवाला मिळाले आहे एकेकाळी सुविधांचा अभाव होता. त्या काळी वाचन संस्कृतीच्या चळवळीमुळे सर्वांगीण विकास होण्यास मोलाचे योगदान लाभले आहे. वाचनामुळे आकलन क्षमता वाढण्यास मोठी मदत होते. आकलन क्षमता वाढल्या मुळेच खरे व आनंदी जीवन जगण्याचा मार्ग मिळतो. आयुष्यात खरा व निखळ आनंद प्राप्त करायचा असेल तर वाचन कौशल्य आत्मसात करा. वाचनामुळे ज्ञानात भर पडून संवाद कौशल्य समृद्ध होते. वाचनाने समृद्ध झालेली माणसं आयुष्यातील प्रत्येक संकटाना सामोरे जाऊ शकतात. वाचनामुळे आपल्याला आवडी प्रमाणे जगण्याचे सामर्थ्य प्राप्त होते असे ते म्हणाले.

latur plus Edition

Jan 11, 2025 Page No. 3

Powered by: Navarashtra.com

दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 11-01-2025

# वाचन संस्कृती हा सुखी व आनंदी जीवनाचा पाया : प्राचार्य डॉ गरूड

## उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवड्यातंर्गत मार्गदर्शन



आदर्श महाविद्यालयात वाचन काल,आज व उद्या विषयावर बोलताना प्राचार्य डॉ दिलीप गरूड.

प्रतिनिधी | उमरगा

वाचन संस्कृती समृद्ध जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. वाचनाने सर्वांगीण विकास होण्यासाठी योगदान लाभते. वाचनामुळे व्यक्तीमत्व विकास होण्यास मदत मिळते. वाचन संस्कृती सुखी व आनंदी जीवनाचा पाया आहे. वाचन संस्कृतीची जपणूक करून आपले जीवन समृद्ध करा असे मत प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि आदर्श महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी (दि.१०) महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम एक ते १५ जानेवारी या कालावधी दरम्यान घेण्यात येत आहे. वाचन काल, आज आणि उद्या या विषयावर आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ.गरुड बोलत होते.

भजन, कीर्तन, प्रवचन, नाटक, चित्रपट, संगीत, कला व लेककला या विविध प्रबोधनप्रमाणे वाचन कला मनाला समृद्ध करणारी कला हे मानवी मानवाला मिळालेले वरदान आहे. एकेकाळी या सुविधांचा अभाव होता त्या काळी वाचन संस्कृती चळवळी मुळे सर्वांगीण विकास होण्यास मोलाचे योगदान लाभले आहे. आयुष्यात खरा व निखळ आनंद प्राप्त करायचा असेलतर वाचन कौशल्य आत्मसात करा. वाचन हे सर्वश्रेष्ठ असल्याने वाचन संस्कृती जपणूक करून आपल्या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ गरुड यांनी केले. हा वाचन संकल्प पंधरवडा संस्था अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस माजीमंत्री बसवराज पाटील यांचे मार्गदर्शनाखा-ली राबविण्यात येत आहे. डॉ लक्ष्मण बिराजदार यांनी प्रास्ताविकात वाचन संस्कृतीही लोप पावत चालल्यामुळे साहित्य निर्मिती हरवत चालल्याची खंत व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा दत्ता भुजबळ यांनी केले. डॉ प्रशांत मोटे यांनी आभार मानले.

देशोन्नती

# वाचन संस्कृती आनंदी जीवनाचा पाया प्राचार्य -डॉ. दिलीप गरुड

देशोन्नती वृत्तसंकलन

**उमरगा :** वाचन हे समृद्ध जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. वाचनामुळे सर्वांगीण विकास होण्यास मोठे योगदान लाभते. वाचनामुळे व्यक्तीमत्व विकास होण्यास मोठी मदत मिळते. वाचन संस्कृती हा सुखी व आनंदी जीवनाचा पाया आहे. जीवनातील निखळ आनंदाचा शोध घेण्यासाठी वाचनाची आवड निर्माण करा. वाचन संस्कृतीची जपणूक ही मानवी मनाची मोठी संपत्ती आहे.



वाचन संस्कृतीची जपणूक करून आपले जीवन समृद्ध करा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व आदर्श महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधी दरम्यान घेण्यात येत आहे. या निमित्त 'वाचन काल, आज आणि उद्या' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ. दिलीप गरुड बोलत होते.

भजन, किर्तन, प्रवचन , नाटक , चित्रपट , संगीत , कला, लोककला , या विविध प्रबोधना प्रमाणेच वाचन कला हि मानवी मनाला समृद्ध करणारी कला असल्याचे सांगताना प्राचार्य डॉ. गरुड पुढे म्हणाले की, विस्मरण हे मानवी मानवाला मिळालेले वरदान आहे. एकेकाळी सुविधांचा अभाव होता. त्या काळी वाचन संस्कृतीच्या चळवळी मुळे सर्वांगीण विकास होण्यास मोलाचे योगदान लाभले आहे. वाचनामुळे आकलन क्षमता वाढण्यास मोठी मदत होते. आकलन क्षमता वाढल्या मुळेच खरे व आनंदी जीवन जगण्याचा मार्ग मिळतो.

देशोन्नती

# आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवाडा

देशोन्नती वृत्तसंकलन

**उमरगा -** विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या साठी येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प पंधरवडा - संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास मोठया उत्साहात प्रारंभ झाला आहे. वाचन संकल्प पंधरवडा या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विविध इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे, मोबाईलचा अति वापर या मुळे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दुरावू लागले आहेत. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी. मराठी भाषे बद्दल विद्यार्थ्यां मध्ये आपुलकी निर्माण व्हावी या करीता महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने शाळा , महाविद्यालये, विद्यापीठ, सार्वजनिक ग्रंथालये या विविध ठिकाणी वाचन संकल्प पंधरवडा - संकल्पना महाराष्ट्राचा हा उपक्रम सुरु केला



आहे. येथील आदर्श महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी या दरम्यान हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वाचन संकल्प पंधरवडा कालावधि दरम्यान सामुहिक वाचन, लेखन, परिक्षणात्मक लेखन, वाचन संवाद , वाचन लेखन स्पर्धा , आदि उपक्रम घेण्यात येत आहेत. हा उपक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांच्या मार्गदर्शना खाती स्वतंत्र समितीचे गठण करण्यात आले आहे. प्रा. डॉ. प्रभाकर कांबळे, प्रा. दत्ता भुजबळ, प्रा. डॉ. प्रशांत मोठे, प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार , प्रा. तात्याराव चव्हाण , प्रा. डॉ. सुधिर मठपती यांचा समावेश करण्यात आला आहे. सकाळी आठ ते दहा व सायंकाळी चार ते सहा वेळेत हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. वाचन संकल्प उपक्रमा मुळे विद्यार्थ्यांना वाचनाची व लेखनाची आवड निर्माण होऊन साहित्यीक कवी लेखक यांची माहिति जाणून घेण्यासाठी मोठी मदत होत असल्याचे मत प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल अखिल शेख सहाय्यक ग्रंथपाल शरणाप्पा मुलगे विशेष परिश्रम घेत आहेत.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा

उमरगा, पुढारी वृत्तसेवा : शहरातील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन संकल्प पंधरवडा - संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. वाचन संकल्प पंधरवडा या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



विविध इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे, मोबाईलच्या अतिवापरामुळे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दुरावू लागले आहेत. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी. मराठी भाषेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आपुलकी निर्माण व्हावी या करिता महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, सार्वजनिक ग्रंथालये या विविध ठिकाणी वाचन संकल्प पंधरवडा - संकल्पना महाराष्ट्राचा हा उपक्रम सुरू केला आहे. येथील आदर्श महाविद्यालयात १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ दिलीप गरुड यांच्या हस्ते करण्यात आले. वाचन संकल्प पंधरवडा कालावधीत सामूहिक वाचन, लेखन, परीक्षणात्मक लेखन, वाचन संवाद , वाचन लेखन स्पर्धा आदी उपक्रम घेण्यात येत आहेत. हा उपक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. गरुड यांच्या मार्गदर्शना खाली स्वतंत्र समितीचे गठण करण्यात आले आहे. प्रा. डॉ. प्रभाकर कांबळे, प्रा. दत्ता भुजबळ, प्रा. डॉ. प्रशांत मोठे, प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार, प्रा तात्याराव चव्हाण, प्रा. डॉ. सुधीर मठपती यांचा समावेश करण्यात आला आहे. सकाळी आठ ते दहा व सायंकाळी चार ते सहा वेळेत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची व लेखनाची आवड निर्माण होऊन साहित्यिक कवी लेखक यांची माहिती जाणून घेण्यासाठी मोठी मदत होत असल्याचे मत प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल अखिल शेख, सहायक ग्रंथपाल शरणाप्पा मुलगे परिश्रम घेत आहेत.

दिव्य मराठी

धाराशिव जिल्हा 08-01-2025

# आदर्श महाविद्यालयात 'वाचन संकल्प' अंतर्गत संवाद आणि लेखन स्पर्धा

## वाचन संकल्प पंधरवडा उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | उमरगा

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास प्रारंभ झाला आहे. वाचन संकल्प पंधरवडा उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विविध इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे, मोबाइलच्या अतिवापरामुळे शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी अभ्यासापासून दूर चालले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, मराठी भाषेबद्दल आपुलकी निर्माण व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून महाविद्यालये, विद्यापीठ, सार्वजनिक ग्रंथालये, शाळांमध्ये वाचन संकल्प पंधरवडा उपक्रम सुरू केला आहे. आदर्श महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी दरम्यान हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्राचार्य डॉ. दिलीप गरूड यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले. या पंधरवाड्यात सामूहिक वाचन, लेखन, परिक्षणात्मक लेखन, वाचन संवाद स्पर्धा घेण्यात येत आहेत. यासाठी

प्रा. डॉ. प्रभाकर कांबळे, प्रा. दत्ता भुजबळ, प्रा. डॉ. प्रशांत मोठे, प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार, प्रा. डॉ. सुधीर मठपती आदींचा समितीत समावेश करण्यात आला आहे. सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ४ ते ६ या वेळेत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तंत्रशिक्षण विभागाकडून महाविद्यालये, विद्यापीठ, सार्वजनिक ग्रंथालये, शाळांमध्ये वाचन संकल्प पंधरवडा उपक्रम सुरू केला आहे. वाचन संकल्प उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाची आवड निर्माण होऊन साहित्यिक, कवी व लेखकांची माहिती जाणून घेण्यासाठी मदत होते, असे मत डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी व्यक्त केले आहे.

यावळा उ
अर्चनाताई पार्ट
संचार
॥ माठ्या॥

# शिक्षणातून अभिप्रेत असलेली समाजव्यवस्था निर्माण व्हावी

संचार वृत्तसेवा

▶ उमरगा, दि. १५-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यातील सर्वसामान्य सामान्यांच्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण मिळावे, यासाठी मिलिंद महाविद्यालयाची उभारणी केली. बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांमुळेच विविध जाती-धर्मातील सर्वसामान्यांच्या मुला-मुलींपर्यंत उच्च शिक्षणाची गंगा पोहोचली. त्यामुळे शिक्षणातून अभिप्रेत असलेली समतावादी समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले.

आदर्श महाविद्यालयाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. गरुड बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. गरुड म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विकासाचे परिवर्तन अपेक्षित होते. उच्च शिक्षणामुळे शैक्षणिक विकासाची अभिसरण प्रक्रिया अखंडितपणे सुरू ठेवून सामाजिक समता निर्माण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेबांनी केले. सामाजिक संघर्ष करून अन्यायाला वाचा फोडणारी माणसेच माणुसकीच्या जगण्याला आनंद मिळवून देतात. जाती-भेदाच्या भिंती तोडून सामाजिक समतेच्या नव्या समाजनिर्मितीसाठी पुढे येण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. गरुड यांनी केले.

प्रास्ताविक प्रा. दत्ता भुजबळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी केले. आभार प्रा. डॉ. भास्कर शिंदे यांनी मानले.

देशोन्नती

# आदर्श महाविद्यालयाच्या पुस्तक प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद !

देशोन्नती वृत्तसंकलन

लातूर : येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधी दरम्यान सुरु असलेल्या वाचन संकल्प पंधरवड्यास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प पंधरवडया निमित्त भरविण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त मिळाला आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग , डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर व आदर्श महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृतिची जपणूक व्हावी या करिता श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील , माजी राज्यमंत्री तथा सरचिटणीस बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शना खाली १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधि दरम्यान 'वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वाचन संकल्प पंधरवड्या निमित्त वाचन , लेखन , परिक्षण संवाद , पुस्तक प्रदर्शन इत्यादी विविध उपक्रम घेण्यात येत आहेत.

येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने



ग्रंथालया सह भौतिक शास्त्र , रसायन शास्त्र , वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र, सामाजिक शास्त्र , हिंदी , मराठी , इंग्रजी भाषा विभाग , सूक्ष्म जीवशास्त्र, शिक्षण शास्त्र या विविध विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्रारंभी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांच्या हस्ते भौतिक शास्त्र विभागात भरविण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनाचे करण्यात आले. पुस्तक प्रदर्शनात महाविद्यालयीन अभ्यासक्रमा बरोबर नामवंत कवी लेखकांची पुस्तके ठेवण्यात आली होती. श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी, श्रमजीवी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय, आदर्श कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला. वाचन संकल्प पंधरवडा यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार, प्रा. डॉ. फुलचंद पवार, प्रा. डॉ. राजशेखर रामशेट्टी, प्रा. डॉ. उदय दिंडोरे, प्रा. शरद कुलकर्णी, प्रा. डॉ. प्रशांत मोटे, प्रा. दत्ता भुजबळ सह सर्व विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक, ग्रंथपाल अखिल शेख, सहाय्यक ग्रंथपाल शरणाप्पा मुलगे हे विशेष परिश्रम घेत आहेत.

पुण्य नगरी

# आदर्श महाविद्यालयाच्या पुस्तक प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



**उमरगा :** येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधी दरम्यान सुरु असलेल्या वाचन संकल्प पंधरवड्यानिमित्त भरविण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर व आदर्श महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृतिची जपणूक व्हावी या करिता श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, माजी राज्यमंत्री तथा सरचिटणीस बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

वाचन संकल्प पंधरवड्यानिमित्त वाचन, लेखन, परिक्षण संवाद, पुस्तक प्रदर्शन इत्यादी विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने ग्रंथालयासह भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र, सामाजिक शास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी भाषा विभाग, सूक्ष्म जीवशास्त्र, शिक्षण शास्त्र या विविध विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांच्या हस्ते करण्यात आले. पुस्तक प्रदर्शनात महाविद्यालयीन अभ्यासक्रमा बरोबर नामवंत कवी लेखकांची पुस्तके ठेवण्यात आली होती. श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशी, श्रमजीवी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय, आदर्श कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला. वाचन संकल्प पंधरवडा यशस्वी करण्यासाठी डॉ. लक्ष्मण बिराजदार, डॉ. फुलचंद पवार, डॉ. राजशेखर रामशेट्टी, डॉ. उदय दिंडोरे, प्रा. शरद कुलकर्णी, डॉ. प्रशांत मोटे, प्रा. दत्ता भुजबळ आदीसह सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, ग्रंथपाल अखिल शेख, सहाय्यक ग्रंथपाल शरणाप्पा मुलगे हे परिश्रम घेत आहेत.

Osmanabad Edition

Jan 16, 2025 Page No. 02

Powered by: erelego.com

लोकमत

# वाचन संस्कृती जपून जीवन समृद्ध करा

## गरूड : महाविद्यालयात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**उमरगा :** वाचन हे समृद्ध जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास होण्यास मोठी मदत मिळते. वाचन संस्कृती हा सुखी व आनंदी जीवनाचा पाया असून, वाचन संस्कृतीची जपणूक करून आपले जीवन समृद्ध करा, असे आवाहन प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी केले.

येथील आदर्श महाविद्यालयाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्त आयोजित 'वाचन काल, आज आणि उद्या' या विषयावर आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ. दिलीप गरुड बोलत होते. भजन, कीर्तन, प्रवचन, नाटक, चित्रपट, संगीत, कला, लोककला या विविध प्रबोधनाप्रमाणेच वाचन कला ही मानवी मनाला समृद्ध करणारी कला असल्याचे सांगताना प्राचार्य डॉ. गरुड म्हणाले, विस्मरण हे मानवी मानवाला मिळालेले वरदान आहे. एकेकाळी सुविधांचा अभाव होता. त्याकाळी वाचन संस्कृतीच्या चळवळीमुळे सर्वांगीण विकास होण्यास मोलाचे योगदान लाभले आहे. वाचनामुळे आकलन क्षमता वाढण्यास मोठी मदत होते. आकलन क्षमता वाढल्या मुळेच खरे व आनंदी जीवन जगण्याचा मार्ग मिळतो. आयुष्यात खरा व निखळ आनंद प्राप्त करायचा असेल तर वाचन कौशल्य आत्मसात करा. वाचनामुळे ज्ञानात भर पडून संवाद कौशल्य समृद्ध होते. वाचनाने समृद्ध झालेली माणसं आयुष्यातील प्रत्येक संकटांना सामोरे जाऊ शकतात, असेही प्राचार्य गरूड यावेळी म्हणाले. प्रास्ताविक प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी केले. वाचन संस्कृती लोप पावत चालल्याने साहित्य निर्मिती हरवत चालल्याची खंत प्रा. डॉ. बिराजदार यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. दत्ता भुजबळ यांनी केले. आभार प्रा. डॉ. प्रशांत मोठे यांनी मानले.

दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 14-01-2025

# आदर्श महाविद्यालयातील पुस्तक प्रदर्शनास प्रतिसाद

प्रतिनिधी | उमरगा

आदर्श महाविद्यालयांमार्फत एक ते १५ जानेवारी या कालावधी दरम्यान सुरु असलेल्या वाचन संकल्प पंधरवड्यास प्रतिसाद मिळाला आहे. वाचन संकल्प पंधरवड्यानिमित्त भरविण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शनास उत्स्फूर्त असा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर व आदर्श महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने वाचन संस्कृतीची जपणूक होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, माजी मंत्री सरचिटणीस बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली \'वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वाचन संकल्प पंधरवड्या निमित्त वाचन, लेखन, परिक्षण संवाद, पुस्तक प्रदर्शन आदी उपक्रम घेण्यात येत आहेत. ग्रंथालयासह भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, हिंदी, मराठी अन इंग्रजी भाषा विभाग, सूक्ष्म जीवशास्त्र, शिक्षण शास्त्र विविध विभागाच्यावतीने पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रारंभी प्राचार्य डॉ दिलीप गरूड यांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाचे उदघाटन झाले. भौतिकशास्त्र विभागात पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयीन अभ्यासक्रमासोबत नामवंत कवी लेखकांची पुस्तके ठेवण्यात आली होती. श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी, श्रमजीवी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. वाचन संकल्प पंधरवडा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.लक्ष्मण बिराजदार, डॉ. फुलचंद पवार, प्रा.डॉ. राजशेखर राम्शेट्टी, डॉ. उदय दिंडोरे, प्रा. शरद कुलकर्णी, डॉ. प्रशांत मोटे, प्रा. दत्ता भुजबळ, प्राध्यापक, ग्रंथपाल अखिल शेख, सहा. ग्रंथपाल शरणाप्पा मुलगे यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.

दिव्य मराठी धाराशिव जिल्हा 11-01-2025

# वाचन संस्कृती हा सुखी व आनंदी जीवनाचा पाया : प्राचार्य डॉ गरूड

## उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवड्यातंर्गत मार्गदर्शन



आदर्श महाविद्यालयात वाचन काल, आज व उद्या विषयावर बोलताना प्राचार्य डॉ दिलीप गरूड.

प्रतिनिधी | उमरगा

वाचन संस्कृती समृद्ध जीवन जगण्याचा एकमेव मार्ग आहे. वाचनाने सर्वांगीण विकास होण्यासाठी योगदान लाभते. वाचनामुळे व्यक्तीमत्व विकास होण्यास मदत मिळते. वाचन संस्कृती सुखी व आनंदी जीवनाचा पाया आहे. वाचन संस्कृतीची जपणूक करून आपले जीवन समृद्ध करा असे मत प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि आदर्श महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी (दि.१०) महाविद्यालयात वाचन संकल्प पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम एक ते १५ जानेवारी या कालावधी दरम्यान घेण्यात येत आहे. वाचन काल, आज आणि उद्या या विषयावर आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ.गरुड बोलत होते.

भजन, कीर्तन, प्रवचन, नाटक, चित्रपट, संगीत, कला व लेककला या विविध प्रबोधनप्रमाणे वाचन कला मनाला समृद्ध करणारी कला हे मानवी मानवाला मिळालेले वरदान आहे. एकेकाळी या सुविधांचा अभाव होता त्या काळी वाचन संस्कृती चळवळी मुळे सर्वांगीण विकास होण्यास मोलाचे योगदान लाभले आहे. आयुष्यात खरा व निखळ आनंद प्राप्त करायचा असेलतर वाचन कौशल्य आत्मसात करा. वाचन हे सर्वश्रेष्ठ असल्याने वाचन संस्कृती जपणूक करून आपल्या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ गरुड यांनी केले. हा वाचन संकल्प पंधरवडा संस्था अध्यक्ष विनायकराव पाटील, सरचिटणीस माजीमंत्री बसवराज पाटील यांचे मार्गदर्शनाखा-ली राबविण्यात येत आहे. डॉ लक्ष्मण बिराजदार यांनी प्रास्ताविकात वाचन संस्कृतीही लोप पावत चालल्यामुळे साहित्य निर्मिती हरवत चालल्याची खंत व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा दत्ता भुजबळ यांनी केले. डॉ प्रशांत मोटे यांनी आभार मानले.